**मुख्य कार्यालय, विरार**
**विरार (प),**
**ता. वसई, जि. पालघर, पिन 401 303.**

**दुरध्वनी : 0250-2525105/06/2529888/2529890**
**फॅक्स : 0250-2525107**
**ई-मेल : vasaivirarcorporation@yahoo.com**


**जावक क्र. : व.वि.श.म./ /**
दि.१८/०६/२०२६

वसई-विरार शहर महानगरपालिका

"*आंतरराष्ट्रीय योग दिना"निमित्त वसई विरार शहर महानगरपालिका मुख्यालयात "योग सत्राचे" आयोजन*

नागरिकांमध्ये आरोग्यदायी जीवनशैली, शारीरिक तंदुरुस्ती व मानसिक स्वास्थ्याबाबत जागरूकता निर्माण करण्याच्या उद्देशाने दि.२१ जून रोजी जगभरात "आंतरराष्ट्रीय योग दिन" साजरा करण्यात येतो. शासन निर्देशानुसार दरवर्षीप्रमाणे यावर्षीही वसई विरार शहर महानगरपालिकेमार्फतही महानगरपालिका मुख्यालयात दुसऱ्या मजल्यावर रविवार दि.२१ जून २०२६ रोजी सकाळी ०७.०० वाजता तज्ज्ञ योग प्रशिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली "योग सत्राचे" आयोजन करण्यात आले असून या योग सत्रास सन्माननीय लोकप्रतिनिधी, महानगरपालिका अधिकारी व कर्मचारी, मान्यवर नागरिक तसेच विद्यार्थीवर्ग सहभागी होणार आहेत.
योग ही भारताने जगाला दिलेली अमूल्य देणगी असून नियमित योगाभ्यासामुळे शारीरिक आरोग्याबरोबरच मानसिक संतुलन, एकाग्रता व सकारात्मक जीवनदृष्टी विकसित होण्यास मदत होते. यामुळे नागरिकांनी दैनंदिन जीवनात योगाचा अंगीकार करून निरोगी समाजनिर्मितीस हातभार लावावा, तसेच येत्या दि.२१ जून रोजी महानगरपालिकेतर्फे आयोजित तसेच इतर विविध ठिकाणी आयोजित योगसत्रात सहभागी होऊन आपला सक्रिय सहभाग नोंदवून "आंतरराष्ट्रीय योग दिन" उत्साहात साजरा करावा असे आवाहन महानगरपालिका प्रशासनामार्फत करण्यात येत आहे.